VCD 170423 FYBA SEM II MARATHI 3 HRS 100 marks

सूचना :१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे .
२) उजवीकडील अंक गुण दर्शवितात .

प्रश्न १ अ )" "सर्व मोठ्या कवींना" या कवितेतून कवी सौमित्र यांनी कोणती खंत व्यक्त केली आहे? 20

किंवा

ब ) शोध या कवितेतून कवी विनायक पवार हे कोणत्या गोष्टीचा शोध घेण्याचा आग्रह करतात?

प्रश्न २ अ )' जाणीव' या कवितेतून व्यक्त होणारे स्त्रीवादी जाणीव शब्दबद्ध करा? २०

किंवा

ब ) मराठी साहित्यातील कवितेचा प्रवास तुमच्या शब्दात लिहा?

प्रश्न ३ टिपा लिहा ..(कोणतेही दोन ) १०

अ ) ."तिचं बाई होतं जाण "या कवितेतून व्यक्त होणारी स्त्रीची भूमिका.

ब ) "बंदुकीने माणूस मरतो" या कवितेतून कवी संजय यांनी व्यक्त केलेले संघर्षाची जाणीव .

क ) "तिचं बाई होतं जाण "या कवितेतून व्यक्त होणारी स्त्रीची भूमिका.

ड ) काव्य संकल्पना

प्रश्न ४अ ) एका आंब्याचे उत्पादन करणाऱ्या कंपनीने आपल्याला भविष्यकाळात बाजारपेठ कशी काबीज करता येईल याचा अभ्यास करणाऱ्या समितीची नेमणूक केली आहे.तुम्ही त्या समितीचे सभासद आहात असे समजून अह्वालात्मक इतिवृत्त तयार करा . १०

किंवा

ब ) सूरज वाशिंग पावडरची विक्री कमी झाल्याची कारणं आणि त्यावरचे उपाय शोधण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीचा इतिवृत्तात्मक अहवाल लिहा.

प्रश्न ५अ ) मालवणी मसाले बाजारात आले आहेत अशी कल्पना करून कंपनीचे नाव कंपनीची मुद्रा घोषवाक्य यासह वर्तमानपत्रासाठी जाहिरात लेखन करा. १०

किंवा

ब) एका नामांकित बँकेला नवीन शाखा उघडण्यासाठी कल्याण परिसरात जागा हवी आहे त्याची जाहिरात तयार करा.

munotes.in

प्रश्न ६ अ) पुढील उताऱ्यावरून प्रश्न -उत्तरे लिहा .

१०

ब ) लक्ष्मणराव किर्लोस्कर यांना जन्म एका छोट्याशा खेड्यात झाला. लहानपणापासून त्यांचे नेमलेल्या अभ्यासात कधीच लक्ष नव्हते. मोडकीतोडकी घड्याळे, चित्रे ,खडू, कोळसा अशा वस्तू ते गोळा करत. स्टेशन वर जाऊन त्यांना बस आगगाडीचे इंजिन वाहत बसायला त्यांना खूप आवडे. शाळेत देखील गणीत, संस्कृत असे विषय त्यांना मुळीच आवडत नसत . मात्र भूमिती, भूगोल, आणि चित्रकला हे त्यांचे आवडते विषय. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी शाळा सोडून देण्याचा निश्चय केला. यंत्राची त्यांना विलक्षण आवड त्यामुळे चित्रकलेचे शिक्षण सोडून ते एका यंत्र बनवण्याच्या कारखान्यामध्ये काम करू लागले. नुसतेच एखादे यंत्र चालवून त्यांचे समाधान होत नसे. ते यंत्र कसे बनवले आहे याकडे त्यांचे लक्ष असे. पूर्वीच्या कोणताही यंत्राचा अनुभव नसताना एका छापखाना जर्मनीहून आणवलेले छपाईयंत्र बसवण्याचे काम त्यांनी केले .. नवनवीन यंत्राशी खेळण्याचा त्यांना जणू छंदच जडला होता. प्रत्येक नवे यंत्र म्हणजे त्यांना एक नवे आव्हान वाटत असे.

प्रश्न १ लक्ष्मण रावांना कोणता छंद जडला होता?

प्रश्न २ त्यांना लहानपणी काय काय आवडे ?

प्रश्न ३ अनुभव नसतानाही त्यांनी कोणते काम केले ?

प्रश्न ४ लक्ष्मण राव यांचा जन्म कुठे झाला?

किंवा

नागपूर नगरात राम नावाचा एक मुलगा आईबरोबर राहत होता. तो अतिशय हुशार व स्वाभिमानी होता. पण प्रेमळ आणि हळवा ही होता. राम दहावीत असतानाची गोष्ट आहे. त्याचे शिक्षक व त्याचे मित्र सर्वांना खात्री होती की राम दहावीत उत्तम गुण मिळवून राम आपल्या शाळेचे व नगराचे नाव सर्वत्र पसरविल. पण झाले भलतेच .रामला टायफाईड झाला. प्रथम सत्रांत परीक्षा जवळ आली होती. राम ने आजारातही अभ्यास सुरू ठेवला होता. त्याला पहिला नंबर जाऊ द्यायचा नव्हता. आईला निराश करायचे नव्हते .आईवर त्याचे खूप प्रेम होते.

प्रश्न १ राम कोणत्या नगरात राहत होता ?

प्रश्न २ राम कोणत्या इयत्तेत शिकत होता ?

प्रश्न ३ रामला कोणता आजार झाला ?

प्रश्न ४ रामचे कोणावर प्रेम होते ?

प्रश्न ५ उताऱ्याला समर्पक शिर्षक द्या .

munotes.in

प्रश्न ७ अ ).पुढील उताऱ्याचे १/३ सारांश लेखन करा . १०

आळस सोडावयाचा म्हणजे शरीर परिश्रम करावयाचे आळसाला जिंकण्याचा हाच एक उपाय आहे .हा उपाय अमलात आणला नाही तर त्याची शिक्षाही निसर्ग भोगावयास लावेल रोग्याच्या किंवा अन्य रूपाची शिक्षा भोगली सुटत नाही. शरीर आहे तर श्रम करावे लागणार शरीर आश्रमात गेलेली वेळ फुकट जात नाही. त्याच्या मोबदल्यात उत्तम आरोग्य लाभते. बुद्धी सतेज, तीव्र व शुद्ध होते. पुष्कळ विचारवंतांच्या विचारातही त्यांच्या पोटदुखीचे व डोकेदुखी .प्रतिबिंब उमटते. विचारवंत जर उन्हात मोकळ्या वेळेत सृष्टीच्या सानिध्यात मेहनत करतील तर त्यांचे विचारही तेजस्वी होतील . शारीरिक रोगाचा मनावर परिणाम होतो तसा आरोग्यावरही परिणाम होतो.

किंवा

ब )वेळ ही फार मौल्यवान गोष्ट आहे. म्हणून वेळेचा उपयोग समजूतदारपणे केला पाहिजे. वेळेचा वेग किती? हे कोणालाच सांगता येणार नाही. पण जो वेळेचे भान ठेवतो .त्याला वेळेबरोबर निश्चित जाता येते. वेळेचे महत्त्व जाणून कामाचे नियोजन करतो. त्याला दैनंदिन कामाव्यतिरिक्त इतर अनेक गोष्टींसाठी भरपूर वेळ देता येतो. वेळेचे महत्त्व जाणारी माणसे आपल्या छंदाचे मनापासून पूर्तता करू शकतात. दिवसभराच्या कामाच्या व्यापातून घरी आलेली व्यक्ती दीड-दोन तास ग्रंथालयात वेळ घालवू शकते. वेळ नाही ही सबब आळशी माणसे देतात.

प्रश्न ८ पुढीलपैकी एका विषयावर निबंध लेखन करा . १०

१ )फॅशनचे वेड

२ ) झाडे लावा झाडे वाचवा

3 ) वर्तमान पत्राचे महत्व

४ )मोबाईल शाप की वरदान

munotes.in